# नागरिकांची सनद

## साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत सर्वसामान्य नागरिकांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजना

- मराठी भाषा, साहित्य संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन आणि संवर्धन करण्यासाठी आणि मराठी भाषेत विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतरावजी चव्हाण यांची होती. सर्व देशामध्ये राज्य पातळीवर साहित्य संस्कृती विषयक स्थापन करण्यात आलेले हे पहिलेच मंडळ होय.

- मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते.

- महाराष्ट्राची भाषा, साहित्य, संस्कृती आणि इतिहास हे विषय तसेच विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान , समाजविद्या यांच्या कक्षेत येणारे या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

- शासनाने मंडळाकडे सोपविलेली वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ मौलिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे.

## मंडळाच्या योजना :

### १) मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना -

* **शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला** - या मालिकेतील पुस्तके, विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांवरील असून मराठी वाचकांना पूरक व संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी ठरतात.

* **उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर** - मराठीशिवाय इंग्रजी, रशियन, फ्रेंच संस्कृत व प्राकृत इत्यादी अन्य भाषांतील विविध विषयांवरील पुस्तके मंडळाने मराठीमध्ये भाषांतरित केली आहेत.

* **महाराष्ट्राचा इतिहास व महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन प्रकाशन व संशोधन** - १) महाराष्ट्राचा प्रमाणभूत असा सुलभ राजकीय, सांस्कृतिक इतिहास मराठी भाषेत नव्याने संपादित/प्रकाशित करण्याची ही योजना आहे.

प्रागैतिहासिक कालापासून ते आधुनिक कालापर्यंत साधारणत: प्रत्येकी ५०० पृष्ठांच्या ५ खंडात म्हणजे (१) प्राचीन कालखंड, (२) मध्ययुगीन कालखंड, (३) मराठा कालखंड भाग-१, शिवकाल, (४) मराठा कालखंड भाग-२ पेशवेकाल व (५) आधुनिक कालखंड प्रकाशित करण्यात येतील. यापैकी प्राचीन कालखंड भाग-१, मध्ययुगीन कालखंड भाग-१ (खंड १ व २), मराठा कालखंड भाग-१ (शिवकाल) व मराठा कालखंड भाग-२, पेशवेकाल (६ ) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला हे खंड प्रकाशित झाले आहेत. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड दुसरा छपाईसाठी शासकीय मुद्रणालयास सोपविण्यात आला आहे.

* **<u>वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक स्वरुपाची प्रकाशने</u>** - वाचकास कमी किमतीत उपलब्ध करुन देण्याच्या या योजनेत मराठीतील प्रतिभावंत साहित्यिकांच्या साहित्याचे पुनर्मुद्रण, समाज परिवर्तन घडविण्यास मदत होऊ शकेल असे थोर विचारवंतांचे वाङ्मय, असामान्य व्यक्तिंची चरित्रे, वैचारिक, समिक्षात्मक बृहद्ग्रंथ वगैरे प्रकाशित करण्यात येतात.

* **<u>महाराष्ट्राचे शिल्पकार</u>** - महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्यांनी हातभार लावला त्यांच्या जीवनकार्यावर आधारित साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची चरित्रे महाराष्ट्राचे शिल्पकार या योजनेंतर्गत पुस्तक रुपाने प्रकाशित करण्याची ही योजना आहे.

**२) <u>ललित/ललितेत्तर वाङ्मयासाठी अनुदान</u>** - या योजनेअंतर्गत मराठीतील ललित/ललितेतर विषयांवरील वाङ्मयीन गुणवत्तापूर्ण अशा लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

**३) <u>नवलेखकांना प्रोत्साहन अनुदान योजना - १) नवलेखकांना प्रोत्साहन</u>** - या योजनेत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा लेखकांना काव्य, कथा, नाटक/एकांकिका, कादंबरी, ललितगद्य व बालवाङ्मय या लेखनाच्या प्रथम प्रकाशनासाठी अनुदान दिले जाते.

**४) <u>नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा</u>** - नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे,म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांच्या कार्यशाळा/चर्चासत्रे आयोजित केल्या जातात.

**५) <u>साहित्य संस्थांना अनुदान</u>** - मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी अनुदान योजनेंतर्गत
१) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ
२) विदर्भ मराठी साहित्य परिषद, नागपूर
३) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद
४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई
६) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी
७) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या ७ संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम रु. ५.०० लाखाचे अनुदान देण्यात येते.

**६) <u>नियतकालिकांना अनुदान योजना</u>**-- या योजनेत बहुविध वाङ्मयीन, समाजोपयोगी, समीक्षात्मक, वैचारिक विचारधारा असलेल्या नियतकालिकांचा अंतर्भाव असतो. अशा नियतकालिकांचा वाङ्.मयीन दर्जा, नियमितता, उपयुक्तता यांचा साकल्याने विचार केला जातो.

**७) अन्य मराठी साहित्य संमेलन अनुदान योजना** - या योजनेत महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मुख्य प्रवाहापेक्षा वेगळया अन्य साहित्य संमेलनाला रक्कम रू. ३० लक्षच्या मर्यादेत अनुदान दिले जाते.
**८) <u>स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना</u>** - या योजनेअंतर्गत अ)प्रौढ विभागात २२ साहित्य पुरस्कारासाठी प्रत्येकी १ लक्ष रकमचे एकुण २२ पुरस्कार दिले जातात. ब)बालवाङ्मय पुरस्कार या विभागात ६ साहित्यप्रकारासाठी प्रत्येकी ५० हजार रकमेचे ६ पुरस्कार दिले जातात. क)प्रथम प्रकाशन विभागात ६ साहित्य प्रकारासाठी प्रत्येकी ५० हजार रकमेचे ६ पुरस्कार ड) सरफोजी भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार या विभागात रू. १ लक्ष रकमेचा एक पुरस्कार असे रू. २९ लक्ष रकमेचे एकूण पस्तीस पुरस्कार प्रदान केले जातात.

**९) <u>विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार</u> -** राज्य शासनाच्यावतीने रंगभूमी, पुस्तक प्रकाशन, वाङ्मय इत्यादी क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना जीवन गौरव पुरस्कार दिला जातो. त्याच धर्तीवर साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकास ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार मंडळाच्यावतीने सन २०१२ - १३ या वर्षापासून प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरूप रू. ५,००,०००/- (अक्षरी रूपये पाच लक्ष फक्त ) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**१०) <u>श्री.पु.भागवत पुरस्कार</u> -** मंडळाच्यावतीने सन २०१२ - १३ या वर्षापासून श्री.पु.भागवत पुरस्कार देण्यात येत आहे. साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री.पु.भागवत यांच्या नावे पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप रू. ३,००,०००/- (अक्षरी रूपये तीन लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**११) <u>मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास</u>** - या प्रकल्पाच्या संपादनाचे काम प्रा.दत्ता भगत यांच्याकडे सोपविण्यात आले असून सदर प्रकल्प संपादनाच्या अंतिम टप्प्यात आहे.

**१२) नाटय संज्ञा कोश -** या प्रकल्पाच्या संपादनाचे काम डॉ. विलास खोले यांच्याकडे सोपविण्यात आलेआहे.

**<u>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून हाती घेण्यात आलेले प्रकल्प--</u>**

१) मंडळाकडून प्रकाशित झालेल्या ४४४ पुस्तकांचे ई - बुक

२) एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून आतापर्यंत महाराष्ट्रात झालेल्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास

३) महाराष्ट्राच्या दृश्यात्मक कलांच्या परंपरांचा आढावा-बृहद्ग्रंथ प्रकल्प

४) १९ व्या व २० व्या शतकातील अध्यात्म मार्गदर्शकांचा बोध

५) मराठी सारस्वतांचे चित्र चरित्र

६) सत्यशोधकांचे अंतरंग

७) सूफी तत्वज्ञान : सखोल विश्लेषण -- बृहद्ग्रंथ

८) गुरूवर्य कृ.अ. केळूस्कर यांचे समग्र वाङ्मय

९) भारतातील ग्रंथालय चळवळीचा समग्र इतिहास

१०) महाराष्ट्राबाहेरील मराठी माणसांच्या कामगिरीचा समग्र आणि सम्यक इतिहास

११) अभंगसेतू - संत वचनांचे अनुवाद

१२) अक्षर बालवाङ्मय : संहिता शोध व बृहद संदर्भग्रंथ

१३) नक्षत्र नीलनभीचे - समग्र बालकवी

१४) महाराष्ट्राच्या प्रयोगात्मक लोककला : परंपरा आणि नवता (१८५० ते २०१६)

१५) कवीवर्य नामदेव ढसाळ यांचे समग्र वाङ्मय बृहदप्रकल्प

१६) नागेश विनायक बापट यांचे समग्र वाङ्मय

१७) मराठीतील बाल साहित्य : इतिहास लेखन आणि संमीक्षा संपादन

१८) आधुनिक महाराष्ट्र : अन्वेषणात्मक कालपट

१९) महाराष्ट्रातील नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, गाणपत्य, चैतन्य , लिंगायत, आनंद व अन्य संप्रदायांच्या मध्ययुगीन वाङ्मयातील अप्रकाशित व असंग्रहित स्फुट कवितांचे प्रकाशन

२०) बसव चरित्र संशोधन : जीवन व सामाजिक/सांस्कृतिक कार्य (कन्नड संत व शरण चळवळीचे प्रणेते बसवण्णा उर्फ बसवेश्वर यांचे संशोधनपूर्ण चरित्र लेखन)

२१) होळकरशाहीचा समग्र इतिहास

२२) मध्ययुगीन कालखंडातील जैन साहित्यातील दुर्मिळ व अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथाचे संशोधन व प्रकाशन

**योजनेचा लाभ देण्याची कार्यपद्धती**

**१ -- नवलेखक अनुदान कार्यपद्धती**

१) नवलेखक अनुदान योजनेची प्रसिद्धी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांमधून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात दिली जाते व दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत टंकलिखित साहित्य स्विकारली जाते .

२) मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही ही माहिती ठेवली जाते.

३) या प्रसिद्धीच्या अनुषंगाने निर्धारित कालावधित आलेले सर्व टंकलिखित साहित्य नवलेखक अनुदान समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतात.

४) वाड्.मय प्रकारानुसार संबंधित तज्ज्ञांकडून टंकलिखित साहित्याचा दर्जा व गुणवत्ता तपासली जाते.

५) त्यानंतर अनुकूल अभिप्राय असलेल्या टंकलिखित साहित्य प्रकाशनार्थ प्रकाशकांना सोपविली जाते.

६) प्रतिकूल अभिप्राय असलेल्या लेखकांना नकार कळविला जातो.

७) या योजनेत मुद्रणासाठी पुस्तके मिळावीत म्हणून प्रकाशकांनी मंडळाकडे अर्ज करावा लागतो. नवलेखक अनुदान समिती प्रकाशकांचा दर्जा, अनुभव, विश्वासार्हता बघून दरवर्षी प्रकाशकांची यादी तयार करते व जुन्या यादीवरही पुर्नविचार केला जातो.

८) नवलेखकांच्या ज्या टंकलिखित साहित्याला अनुकूल अभिप्राय मिळतो ती टंकलिखित साहित्य मुद्रणासाठी निवड झालेल्या प्रकाशकांकडे पाठविली जातात.

९) प्रकाशकाला मुद्रण पूर्ण झाल्यावर निर्मिती खर्चाच्या ७५ टक्के रक्कम दिली जाते.

१०) संपूर्ण प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी -- एक ते दीड वर्ष

**२ -- नियतकालिकांना अनुदान कार्यपद्धती --**

१) मंडळाकडे अनुदानासाठी स्वत:अर्ज करणाऱ्या नियतकालिकांचा या योजनेमधून अनुदान देण्यासाठी विचार केला जातो.

२) नियतकालिक अनुदान समितीपुढे मंडळाला प्राप्त झालेले सर्व अर्ज व नियतकालिके विचारार्थ ठेवली जातात.

३) समितीचे सदस्य वाड्.मयीन नियतकालिकांची गुणवत्ता, दर्जा, नियमितता, उपयुक्तता यांचा साकल्याने विचार करुन (१)अनुदानासाठी शिफारस करणे किंवा

(२) अनुदानासाठी अपात्र ठरवणे

(३) अनुदान वाढ किंवा घट करणे

(४) अनुदान थांबविणे अशा पद्धतीने निर्णय घेतात.

(४) प्रतिकूल / अनुकूल अभिप्राय संबंधितांना कळविला जातो.

(५) अनुदानासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर अनुदान मान्य होईपर्यंतचा कालावधी--अंदाजे एक वर्ष

**३ -- अन्य मराठी साहित्य संमेलनाला अनुदान योजनेची कार्यपद्धती -**

१) या योजनेअंतर्गत मंडळाकडून दरवर्षी एप्रिल अखेर वृत्तपत्रात जाहिरात देवून दिनांक १ मे ते ३१ मे या दरम्यान राज्यातील संस्था नोदंणी अधिनियम, १८६० आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी असलेल्या संस्थांकडून अर्ज मागविले जातात

२) मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही वरील कालावधीत सदर योजनेची माहिती व अर्ज उपलब्ध करून देण्यात येतो.

३) संमेलनाच्या अनुदानासाठी संस्थांकडून विहित कालमर्यादेत (दि. १ मे ३१ मे या दरम्यान) मंडळास प्राप्त झालेले अर्ज महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या बैठकीत अंतीम निवडीसाठी ठेवण्यात येतात व मराठी भाषा विभाग व शासन निर्णय रासांधो - १०१२/प्र.क्र. १२६/२०१२/भाषा - ३, दि. १७ एप्रिल, २०१५ व मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक रासांधो - १०१५/प्र.क्र.१११/२०१५/भाषा - ३, दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात नमूद नियमावलीतील सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या अन्य साहित्य संमेलनाकरिता पात्र ठरलेल्या व मंडळाच्या बैठकीत निवड करण्यात आलेल्या संस्थाना मंडळाकडून अनुदान वितरीत केले जाते.

**४ -- मंडळातर्फे ललित/ललितेत्तर वाङ्मयासाठी अनुदान योजना--**

१) या योजनेअंतर्गत मंडळाकडे अर्ज करणाऱ्या संस्था अथवा व्यक्तिला रु..३०,०००/- च्या मर्यादेत अनुदान दिले जाते.

२) संबंधित व्यक्तींकडून/संस्थेकडून मंडळाकडे प्राप्त झालेल्या संहिता वाड्.मय प्रकल्प समितीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवल्या जातात

३) सदस्यांनी निवड केलेल्या संहिता त्या त्या विषयातील तज्ञांकडे अभिप्रायासाठी पाठवल्या जातात.

४) अनुकूल अभिप्राय आल्यास संबंधित लेखकाला पुस्तकाच्या प्रकाशनार्थ रु.३०,०००/- चे अनुदान दिले जाते.

५) या सर्व प्रक्रियेला एक ते दीड वर्षांचा कालावधी लागू शकतो.

**५ -- स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेची कार्यपद्धती --**

१) या योजनेअंतर्गत दरवर्षी दि. १ जानेवारी, ते ३१ डिसेंबर, या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांना (प्रथम आवृत्ती) निवडी अंती पुरस्कार देण्यासाठी मंडळाकडून डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयात वृत्तपत्रातून प्रसिद्धी देवून दिनांक ०१ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत प्रवेशिका मागविल्या जातात.

२) मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही वरील कालावधीत स्पर्धेसाठी माहिती व प्रवेशिका उपलब्ध करून देण्यात येते.

३) वरील कालावधीत मंडळाकडे प्राप्त झालेल्या प्रवेशिका व पुस्तकांची छाननी केली जाते व तद्नंतर शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या परीक्षण समितीतील संबधित परीक्षकांकडे त्या त्या वाङ्मय प्रकारातील पुस्तके परीक्षणार्थ व निवडीसाठी पाठविली जातात.

४) परीक्षकांकडून निवडलेल्या पुस्तकांना दरवर्षी दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा गौरव दिन कार्यमक्रमात शासनाकडून पुरस्कार प्रदान केले जातात.

**६-- विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्काराची कार्यपद्धती --**

१) दरवर्षी या पुरस्कारासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व तिच्या ६ घटकसंस्था तसेच मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त तीन कार्यालयाकडून मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या ज्येष्ठ साहित्यिकांच्या नावांच्या शिफारशी मागविण्यात येतात.

२) सदर शिफारशी शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या निवड समितीसमोर ठेवल्या जातात.

३) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. विंदापु - १०१४/प्र.क्र.११२/२०१४/भाषा - ३ दि. १२ फेब्रुवारी, २०१५ या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या निकषांनुसार प्राप्त शिफारशीतून निवड समितीकडून एका ज्येष्ठ साहित्यिकाची निवड पुरस्कारासाठी निवड केली जाते.

४) निवड समितीकडून विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड झालेल्या ज्येष्ठ साहित्यिकास दरवर्षी दि. २७ फेब्रुवारी रोजी आयोजित मराठी भाषा गौरवदिन कार्यक्रमात सदर पुरस्कार शासनाकडून प्रदान केला जातो.

**७ -- श्री. पु. भागवत पुरस्काराची कार्यपद्धती --**

१) दरवर्षी या पुरस्कारासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व तिच्या ६ घटक संस्था तसेच मराठी भाषा विभागाच्या अधिनस्त तीन कार्यालयाकडून साहित्य निर्मिती क्षेत्रात मोलाचे कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थांच्या नावाच्या शिफारशी मागविण्यात येतात.

२) सदर शिफारशी शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या निवड समितीसमोर ठेवल्या जातात.

३) निवड समितीकडून मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्रमांक श्रीपुभा- १०१४ /प्र.क्र.११३/२०१४/भाषा - ३ दि. १२ फेब्रुवारी, २०१५ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या निकषांनुसार प्राप्त शिफारशीतून एका प्रकाशन संस्थेची निवड केली जाते.

४) निवड समितीकडून श्री.पु. भागवत पुरस्कारासाठी निवड झालेल्या प्रकाशन संस्थेस दरवर्षी दि. २७ फेब्रुवारी रोजी आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात सदर पुरस्कार शासनाकडून प्रदान करण्यात येतो.

**************

शासन निर्णय परिपत्रक क्र.१०९९/प्र.क्र.३९/९९/१८ - अ, दि. ८ मार्च, २००० मध्ये विहित केलेल्या तक्त्यानुसार

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची नागरिकांची सनद

| कार्यालयाचे नाव :- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | विभागाकडून/कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तताकेल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी व कर्मचारी व त्याचा ईमेल आयडी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
| १) | **मंडळाची आस्थापना शाखा**<br>मंडळाच्या आस्थापनाविषयक बाबींची पूर्तता करणे आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी पाहणे, मंडळाच्या कार्यालयात सर्वसाधारण देखरेख ठेवणे, शिस्त राखणे, कनिष्ठ कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे,शासनाशी व इतर कार्यालयाशी पत्रव्यवहार करणे, विधानसभा/विधान परिषद प्रश्नांच्या संदर्भात व भारत सरकारशी मा. सचिवांच्या सुचनेनुसार कार्यवाही करणे, सचिवांच्या गैरहजेरीत इतर शासकीय कार्यालयातील अधिकारी व जनतेशी व्यवहार, देवघेव तसेच दूरध्वनी करणे वगैरे, सचिवांच्या सुचनेनुसार लोकलेखा समिती, वार्षिक अंदाजपत्रक, सुधारित अंदाजपत्रक, पंचवार्षिक योजना यांसंबधीचे आराखडा तयार करणे, गोपनीय अभिलेख सांभाळणे, कर्मचाऱ्यांची रजा, अग्रीमे बघणे, लेखा परिक्षण व लेखाविषयक कामे, कार्यालयाने वेळोवेळी सोपविलेली इतर कामे नियमित पार पाडणे. | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी तातडीच्या नसती शक्यतो ४ दिवसात, अन्य नस्ती ४५ दिवसात व इतर विभागाच्या संबंधित नस्ती २ - ३ महिन्यात निकाली काढणे . | अधीक्षक हे पद रिक्त हे पद रिक्त आहे. या पदाचे काम श्री. प्र.ना.मोरे पाहतात. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक. (०२२)२४३२५९३१<br>ई मेल आयडी - secretary.sblc-mh@gov.in | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२) २४३२५९३१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) | **मंडळाची पुस्तक प्रकाशन /अनुदान शाखा**<br>मंडळाच्या व समित्यांच्या बैठकींचे सर्व कामे, बैठकींची विषयसूची व वृत्तांत तयार करणे, मंडळाच्या व समितींच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावर विशेषत: वाङ्मयीन घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही करणे, मंडळाकडे आलेल्या हस्तलिखितांवर त्यांचे लेखक, प्रकाशक व मुद्रणालयाशी कार्यक्रमानुसार व मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार पत्रव्यवहार करणे, मंडळाने प्रकाशनार्थ/अनुदानार्थ स्वीकारलेल्या हस्तलिखितांची पूर्ण माहिती सुरक्षित ठेवणे व त्यावर मंडळाच्या निर्णयानुसार कार्यवाही करणे , हस्तलिखित मुद्रणालयास सोपविण्यापूर्वी त्याची प्रत्यक्ष तपासणी करून ती व्यवस्थित व परिपूर्ण आहेत का याची खात्री करणे, पुस्तक मुद्रणार्थ प्रकाशकाकडे सोपविणे, पुस्तके प्रकाशित होईपर्यंत प्रकाशकाशी , मुद्रणालयाशी आणि लेखकाशी पत्रव्यवहार करणे, विविध मुद्रणालयांकडे / प्रकाशकांकडे सोपविलेल्या पुस्तकांच्या कामाची सतत प्रगती व ती लवकर प्रकाशित होण्यावर लक्ष ठेवणे, मुद्रित झालेली पुस्तके प्रकाशित करून ती मंडळाच्या सदस्यांना वितरित करणे,तसेच मंडळाच्या वतीने स्वीकारलेल्या पुस्तकासंबंधी विविध लेखक, संपादकांकडून करारपत्र करून घेणे त्याचप्रमाणे प्रकाशकांकडे प्रकाशनासाठी सोपविलेल्या पुस्तकासंबधी प्रकाशकांशी पत्रव्यवहार करणे, प्रदर्शने, जाहिराती याद्वारे मंडळाच्या प्रकाशनांची व मंडळाच्या वाङ्मयीन कार्याची प्रसिध्दी करणे, स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, अन्य मराठी साहित्य संमेलनास अन्य मराठी साहित्य संमेलनास अनुदान योजना व मंडळाच्यावतीने हाती घेण्यात येणारे वाङ्मयीन बृहदप्रकल्पासंदर्भातील कामकाज पार पाडणे व कार्यालयाने वेळोवेळी सोपविलेली इतर कामे पार पाडणे. | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी तातडीच्या नसती शक्यतो ४ दिवसात, अन्य नस्ती ४५ दिवसात व इतर विभागाच्या संबंधित नस्ती २ - ३ महिन्यात निकाली काढणे . | श्री. रा. मु. रोकडे, प्रपाठक<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक. (०२२)२४३२५९३१<br>ई मेल आयडी -<br>secretary.sblc-mh@gov.in | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२) २४३२५९३१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३) | **नवलेखक , नियतकालिक अनुदान शाखा**<br>नवलेखक अनुदान योजनेची दरवर्षी जाहिरात प्रसिद्धीस देणे, जाहिरातीनुसार आलेली हस्तलिखिते वाङ्मय प्रकारानुसार नोंद घेणे, रजिस्टर ठेवणे, नवलेखक अनुदान समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवणे, बैठकीसंबधी विषयसूची, वृत्तांत तयार करणे, बैठकीत झालेल्या निर्णयानुसार निवड झालेली हस्तलिखिते तज्ज्ञांकडे अभिप्रायार्थ सोपविणे तदनंतर हस्तलिखीते प्रकाशनार्थ प्रकाशकांकडे सोपविणे,लेखकाशी, तज्ज्ञांशी प्रकाशकांशी पत्रव्यवहार करणे, नवलेखकांना मार्गदर्शन व्हावे म्हणून वाङ्मयप्रकारानुसार कार्यशाळांचे आयोजन करणे,<br>मंडळातर्फे अनुदान मिळत असलेल्या नियतकालिकांना नियमित अनुदान वाटप करणे, संस्थेशी पत्रव्यवहार करणे, नियतकालिक बैठकीत नियतकालिकांची विषयसूची ठेवणे, त्यावर झालेले निर्णय संबधीतांना कळविणे, वृत्तांत लिहिणे वगैरे तसेच कार्यालयाने सोपविलेली इतर कामे. | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी तातडीच्या नसती शक्यतो ४ दिवसात, अन्य नस्ती ४५ दिवसात व इतर विभागाच्या संबंधित नस्ती २ - ३ महिन्यात निकाली काढणे . | वरिष्ठ लिपिक हे पद रिक्त असल्यामुळे या पदाचे काम श्री. प्र. ना.मोरे, प्र. अधीक्षक यांच्या पर्यवेक्षणाखाली कार्यालयातील लिपिक - टंकलेखकाकडून कामकाज पार पाडले जाते.<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२)२४३२५९३१<br>ई मेल आयडी -<br>secretary.sblc-mh@gov.in | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२) २४३२५९३१ |
| ४) | **मंडळाची लेखाशाखा**<br>मंडळाच्या कार्यालयातील मासिक वेतन देयके, अध्यक्षांचे मानधन व आतिथ्य भत्ता, मंडळाचे अध्यक्ष व सदस्यांचे प्रवास व बैठक भत्ता देयके, आकस्मिक खर्चाची देयके, स्थायी अग्रीम नोंदवही, रोखीचे पुस्तक (Cash Book) आकस्मिक व इतर खर्चाची वर्गीकृत नोंदवही तसेच उत्सव अग्रीम, आगाऊ प्रवास भत्ता, वेतन व भत्ते इत्यादी तसेच वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी, अग्रीम नोंदवही इत्यादी तपासणी. वार्षिक अंदाजपत्रक, सुधारित अंदाजपत्रक, वार्षिक विकास कार्यक्रम आदीसंबंधीची माहिती तयार करणे, लेखा आक्षेपांना उत्तर देणे, खर्च मेळ, विनियोजन लेख्यासंबधी माहिती घेणे, महालेखापाल | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी | श्रीमती शुभांगी सु. साडेगावकर, सहायक लेखा अधिकारी, व स्वाती सु. केसरकर, लिपिक ह्या देयके तयार करतात.<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक. (०२२)२४३२५९३१<br>ई मेल आयडी -<br>secretary.sblc-mh@gov.in | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक - (०२२) २४३२५९३१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यालयाकडून होणाऱ्या वार्षिक लेखापरिक्षण पथकास माहिती व कागदपत्रे पुरविणे, रोखीचे व्यवहार पाहणे, धनादेश पाठविणे तसेच कॅशबुक, स्थायी अग्रीम नोंदवही, आकस्मिक खर्च नोंदवही, वर्ग - ४ च्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीची नोंदवही, देयक नोंदवही अद्यायावत ठेवणे, लेखाशाखेतील कागदपत्र सुरक्षित ठेवणे, तसेच किरकोळ पत्रव्यवहार करणे. कार्यालयीन सर्व प्रकारची देयके (आकस्मिक, प्रवासभत्ता व इतर) तयार करणे. पदाच्या अनुषंगाने येणारी व कार्यालयाने सोपविलेली इतर कामे. | किंवा दुसऱ्या दिवशी तातडीच्या नसती शक्यतो ४ दिवसात, अन्य नस्ती ४५ दिवसात व इतर विभागाच्या संबंधित नस्ती २ - ३ महिन्यात निकाली काढणे . | | |
| ५) | **ग्रंथालय शाखा**<br>मंडळाच्या कार्यालयातील ग्रंथाची देखभाल करणे व ग्रंथाची नोंदवहीत नोंद ठेवणे, कार्यालयातील शोकेसमध्ये नव्याने प्रकाशित होणारी मंडळाची व मंडळाच्या अनुदानाने प्रकाशित झालेली सर्व पुस्तके लावणे, जनतेच्या मागणीनुसार मंडळाच्या प्रकाशनाची सूची पाठविणे. मंडळाच्या वेळोवेळी होणाऱ्या बैठकीस व उपसमितीच्या बैठकीस उपस्थित सदस्यांना प्रकाशित पुस्तकांचे वाटप करणे व देवघेव नोंदवहीत नोंद ठेवणे. ग्रंथालयाशी संबंधित वेळोवेळी नेमूण दिलेली इतर कामे | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र. ३च्या कलम १०(१) मधील तरतुदीस अनुसरून तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी तातडीच्या नसती शक्यतो ४ दिवसात, अन्य नस्ती ४५ दिवसात व इतर विभागाच्या संबंधित नस्ती २ - ३ महिन्यात निकाली काढणे . | श्री. प्र. ना. मोरे, ग्रंथालयीन सहायक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक. (०२२)२४३२५९३१<br>ई मेल आयडी - secretary.sblc-mh@gov.in | मा. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मडळ,<br>रवींद्र नाटय मंदिर इमारत, २ रा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५<br>दूरध्वनी क्रमांक. (०२२) २४३२५९३१ |